
# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ७१ शुक्रवार दि.१९ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेत गोदाबाईंचा व्हिडिओ ; मतं कशी डिलीट केली जातात सगळं दाखवलं




काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी आज पत्रकार परिषदत घेत पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर निशाणा साधला. पत्रकार परिषदेच्या सुरुवात करताना, सर्वप्रथम, हा हायड्रोजन बॉम्ब नाही. हायड्रोजन बॉम्ब येत आहे. देशातील तरुणांना निवडणुकीत कसा गोंधळ घातला जात आहे हे दाखवून देण्यासाठी हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. असे म्हटले.

पुढे राहुल गांधी यांनी, मी माझा मुद्दा ठोस पुराव्यांसह मांडत आहे आणि तुम्हाला सांगत आहे की मते कशी बदलली गेली. राहुल यांनी दावा केला की कर्नाटकातील अलांडमध्ये बनावट लॉगिन वापरून ६,००० हून अधिक मते वगळण्यात आली. त्यांच्या सादरीकरणादरम्यान, त्यांनी मत चोरीचे आरोप आणि पुरावे सादर केले. ज्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली होती त्यांनाही त्यांनी संबोधित केले. त्यापैकी एक गोदाबाई होती. राहुल यांनी स्पष्ट केले की मते वगळण्याचे हे प्रयत्न काँग्रेस पक्ष जिंकत असलेल्या बूथवर करण्यात आले होते. त्यांनी गोदाबाई नावाच्या महिलेचे उदाहरण दिले. त्यांनी स्पष्ट केले की, कोणीतरी गोदाबाईच्या नावाने बनावट लॉगिन तयार केले आणि १२ मते वगळण्याचा प्रयत्न केला आणि गोदाबाईंना याची माहिती नव्हती.

राहुल म्हणाले यांनी,कर्नाटकातील अलांड विधानसभा मतदारसंघात कोणीतरी ६,०१८ मते वगळण्याचा प्रयत्न केला. २०२३ च्या निवडणुकीत एकूण किती मते वगळण्यात आली हे आम्हाला माहिती नाही. ती संख्या ६,०२८ पेक्षा जास्त आहे, पण योगायोगाने ही ६,०१८ मते वगळताना कोणीतरी पकडले गेले असा आरोप त्यांनी केला.

पुढे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले की, एका बूथ-स्तरीय अधिकाऱ्याला एका महिलेच्या काकाचे मत वगळण्यात आल्याचे कळले. त्यांनी त्यांच्या काकाचे मत कोणी वगळले आहे हे शोधण्यासाठी चौकशी केली. त्यांना आढळले की त्यांच्या शेजाऱ्याने त्यांचे मत वगळले आहे. जेव्हा त्यांनी त्यांच्या शेजाऱ्याला विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की त्यांनी कोणतेही मत वगळले नाही. याचा अर्थ मत वगळणाऱ्या व्यक्तीला किंवा ज्याचे मत वगळण्यात येत होते त्याला याबद्दल माहिती नव्हती. याचा अर्थ असा की दुसऱ्या कोणीतरी संपूर्ण प्रक्रिया हायजॅक केली आणि मते वगळली. राहुल यांनी दावा केला की, काँग्रेस मतदारांना लक्ष्य करण्यात आले. दलित आणि ओबीसी हे लक्ष्य होते. मतदार यादीतून लक्ष्यित मतदारांची नावे वगळण्यात आली. काँग्रेसच्या संभाव्यतेला कमकुवत करण्यासाठी मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळण्यात आली. मत चोरीबाबत राहुल गांधींची ही दुसरी पत्रकार परिषद आहे. ७ ऑगस्ट रोजी त्यांच्या पहिल्या पत्रकार परिषदेत राहुल यांनी निवडणूक आयोगावर भाजपशी मिलीभगत करून मते चोरण्याचा आरोप केला होता.

## नितीश कुमारांची अमित शहासोबत भेट ; २० मिनिटे बंद दाराआड बैठक, 'या' मुद्द्यावर झाली चर्चा

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची आज सकाळी भेट झाली. नितीश कुमार स्वतः अमित शाह ज्या हॉटेलमध्ये थांबले होते त्याठिकाणी त्यांना भेटण्यासाठी पोहोचले. शहा आणि नितीश कुमार यांनी सुमारे २० मिनिटे चर्चा केली.



बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जाते. समोर आलेल्या माहितीनुसार, दोन्ही नेत्यांनी बिहार विधानसभा निवडणुका आणि एनडीएमधील जागावाटपाच्या सूत्रावर चर्चा केली. बैठकीनंतर अमित शाह विमानतळावर रवाना झाले, तेथून ते रोहतासला जातील.

रात्री भाजप नेत्यांशी बैठक मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासोबत इतर अनेक नेते उपस्थित होते. अमित शाह काल रात्री पाटणा याठिकाणी पोहोचले. त्यांनी बिहार निवडणुकीसंदर्भात हॉटेलमध्ये बिहार भाजपच्या प्रमुख नेत्यांशी ४५ मिनिटे बैठक घेतली. त्यांनी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चर्चा केली. अमित शाह यांनी पक्षाला सर्व स्तरांवर निवडणुकांसाठी तयार राहण्याचे आवाहन केले.

अमित शाह आज दोन बैठकांमध्ये सहभागी होणार अमित शाह आज दोन बैठकांमध्ये सहभागी होतील. एक देहरी-ऑन-सोन आणि दुसरी बेगुसराय येथे होणार आहे. दोन्ही बैठकींमध्ये पक्षाचे वरिष्ठ नेते, आमदार, संघटनात्मक आणि स्थानिक नेते आणि कार्यकर्ते उपस्थित राहतील. संबंधित जिल्ह्यांचे प्रभारी देखील सहभागी होतील. निवडणूक रणनीतीवर चर्चा केली जाईल, निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला जाईल, अमित शाह विजयासाठी आपला मंत्र देतील आणि बूथ सक्षमीकरणावर चर्चा केली जाईल.

कार्यक्रम १२:३० वाजता देहरी-ऑन-सोन येथील लालन सिंह स्टेडियममध्ये सुरू होईल. अमित शाह रोहतास, कैमूर, आरा, बक्सर, गया पूर्व, गया पश्चिम, नवादा, जहानाबाद, अरवल आणि औरंगाबाद या संघटनात्मक जिल्ह्यांतील नेत्यांशी भेटतील. दुपारी ३ वाजता बेगुसराय येथील रिफायनरी टाउनशिप स्पोर्ट्स ग्राउंडवर बैठक होईल. अमित शाह पटना ग्रामीण, पटना महानगर, बारह, नालंदा, शेखपुरा, मुंगेर, जमुई, लखीसराय, खगरिया आणि बेगुसराय या संघटनात्मक जिल्ह्यांतील नेत्यांशी चर्चा करतील.

## स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणी कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता पालकमंत्र्यांचे निर्देश ; शहर जिल्हा भाजपच्या पाठपुराव्याला यश

लातूर प्रतिनिधी - शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात स्टॅच्यू ऑफ नॉलेज म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारण्यास मंजुरी मिळालेली आहे. सदर पुतळा उभारण्याच्या कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिलेले आहे. याबाबत शहर जिल्हा भाजपच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. पालकमंत्र्यांनी निर्देश दिल्यामुळे शहर जिल्हा भाजपच्या पाठपुराव्याला यश आलेले आहे.

लातूर शहराच्या सौंदर्यात भर टाकणारा आणि महाराष्ट्रातील सर्वात मोठा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याच्या निर्णयाला विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली होती. लातूर महानगरपालिकेच्या माध्यमातून हा पुतळा उभारण्यासाठी १० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळून सदर निधी मनपाकडे वर्ग झालेला आहे. मात्र पुतळा उभारण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे, असे निदर्शनास आणून देत हा पुतळा उभारण्याचे काम प्रलंबित होते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा हा ७५ फुटी पुतळा उभारण्याचे काम लवकरात लवकर सुरु करावे अशी मागणी सातत्याने होत होती. याबाबत शहर जिल्हा भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा करून अतिरिक निधी मंजूर करावा व पुतळा



उभारण्याच्या कामास सुरुवात करावी अशी मागणी केलेली होती.

पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले हे १७ सप्टेंबर रोजी लातूर दौऱ्यावर आल्यानंतर भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी पालकमंत्र्यांची भेट घेऊन स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभारणीच्या कामास सुरुवात करण्यासाठी संबंधिताना सुचित करावे, अशी मागणी केली होती. पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी तात्काळ याबाबत संबंधित यंत्रणेला निर्देश देऊन स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभारणीच्या कामासाठी आवश्यक असणारी प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पुर्ण करून कामास सुरुवात करावी अशा सुचना दिल्या आहेत. त्याचबरोबर पुतळा उभारणीसाठी आवश्यक असणारा अतिरिक्त निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांना दिली आहे. पालकमंत्र्यांनी स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभारणीच्या कामाची प्रशासकीय मान्यता काढण्याचे निर्देश दिल्यामुळे लवकरात लवकर या कामाला आता सुरुवात होणार आहे. याबाबत शहर जिल्हा भाजपाने जो पाठपुरावा केला होता त्यास यश आलेले आहे.

## स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उभारणी कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता पालकमंत्र्यांचे निर्देश ;व्ही एस पँथर्स च्या मागणीला यश

लातूर प्रतिनिधी - शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसरात स्टॅच्यू ऑफ नॉलेज म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारण्यास मंजुरी मिळालेली आहे. सदर पुतळा उभारण्याच्या कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिलेले आहे. याबाबत व्ही एस पँथर्स युवा संघटनेने लातूर शहरात २० मार्च २०२३ रोजी सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली भव्य महामोर्चा काढून डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी नॉलेज ऑफ स्टॅच्यू म्हणजेच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे ७५ फुटी स्मारक व्हावे ही मागणी करण्यात आली आणि त्याच दिवशी औसा तालुक्याचे आमदार अभिमन्यू पवार साहेब यांनी दूरध्वनी द्वारा मोर्चेकर्यांशी दूरध्वनी द्वारा संपर्क साधून नॉलेज ऑफ स्टॅच्यू उभारणीसाठी मंजुरी मिळाली आहे असे आश्वस्त केले होते. त्यानंतर वारंवार सं अध्यक्षविनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार जिल्हा पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी महापालिका आयुक्त यांना निवेदन देऊन ही मागणी लावून धरली होती मागच्या महिन्यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यामध्ये मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन या मागणीचा पाठपुरावा केला होता त्यानंतर मराठवाडा मुक्ती संग्राम दिना दिवशी शासकीय विश्रामगृह याठिकाणी भेट घेऊन संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर यांनी पुन्हा एकदा नॉलेज ऑफ साठी निवेदन दिले आणि पालकमंत्र्यांनी निर्देश दिल्यामुळे व्ही एस पँथर्स च्या सातत्यपूर्ण मागणीला यश मिळाले आहे . भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या या स्मारकामुळे येथील आंबेडकरी जनतेला आणि आंबेडकरवादी कार्यकर्त्याला बळ मिळेल. आणि









लातूर शहराच्या सौंदर्यात भर टाकणारा आणि महाराष्ट्रातील सर्वात मोठा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याच्या निर्णयाला विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली होती. लातूर महानगरपालिकेच्या माध्यमातून हा पुतळा उभारण्यासाठी १० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळून सदर निधी मनपाकडे वर्ग झालेला आहे. मात्र पुतळा उभारण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे, असे निदर्शनास आणून देत हा पुतळा उभारण्याचे काम प्रलंबित होते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा हा ७५ फुटी पुतळा उभारण्याचे काम लवकरात लवकर सुरु करावे अशी मागणी सातत्याने होत होती. याबाबत व्ही एस पंथेर्सच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे पाठपुरावा करून अतिरिक निधी मंजूर करावा व पुतळा उभारण्याच्या कामास सुरुवात करावी अशी मागणी केलेली होती.

पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले हे १७ सप्टेंबर रोजी लातूर दौऱ्यावर आल्यानंतर व्ही एस पँथर्स जिल्हाध्यक्ष शरद किनीकर यांनी पालकमंत्र्यांची भेट घेऊन स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभारणीच्या कामास सुरुवात करण्यासाठी संबंधिताना सुचित करावे, अशी मागणी केली होती. पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी तात्काळ याबाबत संबंधित यंत्रणेला निर्देश देऊन स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभारणीच्या कामासाठी आवश्यक असणारी प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पुर्ण करून कामास सुरुवात करावी अशा सुचना दिल्या आहेत. त्याचबरोबर पुतळा उभारणीसाठी आवश्यक असणारा अतिरिक्त निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी जिल्हाध्यक्ष शरद किणीकर याना दिली आहे. पालकमंत्र्यांनी स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभारणीच्या कामाची प्रशासकीय मान्यता काढण्याचे निर्देश दिल्यामुळे लवकरात लवकर या कामाला आता सुरुवात होणार आहे. याबाबत व्ही एस पँथर्स ने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा केला होता त्यास यश आलेले आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## दूरदर्शी आणि समर्पित विज्ञानयात्री!

भारतीय अणुऊर्जा क्षेत्रातील दूरदर्शी शास्त्रज्ञ म्हणून डॉ. शिवराम बाबुराव भोजे यांची ओळख होती. अणुऊर्जा अभियांत्रिकीच्या प्रगतीत त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. विशेषत: फास्ट ब्रीडर रिॲक्टर तंत्रज्ञानाची भारतात उभारण्यात भूमिका निर्णायक ठरली. कल्पक्कम येथे उभारलेल्या फास्ट ब्रीडर टेस्ट रिॲक्टरच्या (एफबीटीआर) रचना, बांधकाम आणि संचालनात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या प्रयत्नामुळे भारताचा अणुऊर्जा कार्यक्रम दीर्घकाळ टिकून राहण्यास भक्कम पाया लाभला.

प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर डॉ. शिवराम भोजे यांनी जगाचा निरोप घेतला आणि अणुऊर्जेसह पदार्थ विज्ञानाच्या क्षेत्रातील एक प्रगाढ बुद्धिवंत आपल्यातून निघून गेला. आज भारताने विज्ञानाच्या क्षेत्रात जी उत्तुंग भरारी घेतली आहे, त्यामध्ये देशातील अनेक बुद्धिवान, प्रतिभावंत वैज्ञानिकांचे अमूल्य योगदान आहे. डॉ. भोजे हे त्यापैकी एक दूरदर्शी वैज्ञानिक होत. कागल तालुक्यातील कसबा सांगाव या गावातील एका साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या अवलियाने अणुऊर्जे सारख्या क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या विषयामध्ये केवळ प्रावीण्यच मिळवले नाही, तर फास्ट ब्रिडर रिॲक्टर टेक्नॉलॉजीचे शिल्पकार म्हणून नाव इतिहासात नोंदवले. अणुभट्टी प्रकल्पांची रचना, आखणी आणि उभारणी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी बौद्धिक सामर्थ्याने भारताच्या अणुशक्ती मोहिमेस मोलाचे योगदान दिले.

'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या दोन उपक्रमांवर गेले दशकभर भारत 'विकसित देश' बनण्याच्या दिशेने पुढे जात आहे; परंतु डॉ. भोजे यांनी अणुतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात फास्ट ब्रीडर रिॲक्टर टेक्नॉलॉजीच्या रूपाने एक मोठी स्वदेशी उपलब्धी भारताला मिळवून दिली. या तंत्रज्ञानाचे ते शिल्पकार होते. त्यांच्या कार्यामुळेच आज भारत पीएफबीआर आणि थोरीयमवर आधारित अणुभट्टीच्या दिशेने वाटचाल करत आहे. कल्पक्कम येथील फास्ट ब्रीडर टेस्ट रिॲक्टर (एफबीटीआर) हा प्रकल्प भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रासाठी क्रांतिकारी ठरला. कारण, यामुळे भारताला ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन प्राप्त होण्यास दिशा मिळाली. त्यांच्या नेतृत्वाखाली इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्रामध्ये (आयजीसीएआर) प्रकल्पाचे यशस्वी संचालन झाले आणि प्रोटोटाईप फास्ट ब्रीडर रिॲक्टर (पीएफबीआर) हा ५०० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प अंमलात आणला गेला. या रिॲक्टरच्या विशेष रचना आणि कार्यपद्धतीशी संबंधित अनेक गुंतागुंतीच्या अभियांत्रिकी समस्यांचे निराकरण करण्यामागे डॉ. भोजे यांचे मोलाचे योगदान होते. अणुभट्ट्यांची कार्यपद्धती, उष्णतेचे वहन, तसेच सुरक्षिततेची काटेकोर अंमलबजावणी याबाबतचे त्यांचे सखोल ज्ञान या प्रकल्पाच्या यशस्वी संचालनासाठी अत्यावश्यक ठरले.

'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तीनुसार डॉ. भोजे यांच्यातील विज्ञानवेडाची झलक बालपणापासूनच दिसून येत होती. शालेय जीवनातील गुण आणि अभ्यासाची आवड त्यांना विज्ञान क्षेत्राकडे वळवणारी ठरली. त्यांनी पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९६५ मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली. त्या वर्षीच त्यांनी भाभा अणुसंशोधन केंद्राच्या प्रशिक्षण शाळेत प्रवेश घेतला आणि तिथे त्यांचे विज्ञान क्षेत्रातील कारकिर्दीचे बीजारोपण झाले. तेथे केलेल्या मूलभूत संशोधनामुळे त्यांनी एकामागून एक उच्च पदापर्यंत आलेख सतत उंचावत ठेवला. त्यांचे नेतृत्व गुण, संशोधक वृत्ती आणि सर्वांना पुढे घेऊन जाण्याची त्यांनी स्वीकारार्ह दृष्टी यामुळे ते सहकार्यांमध्ये कमालीचे लोकप्रिय होते.

डॉ. भोजे यांनी अणुऊर्जा क्षेत्रात केवळ तांत्रिक योगदान दिले नाही, तर त्यांनी सुरक्षितता, कार्यक्षमता आणि दीर्घकालीन वापर करण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरुण वैज्ञानिक प्रशिक्षित झाले आणि त्यांनी भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रात नवनवीन शोध लावले. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीच्या विविध समित्यांमध्ये सहभाग घेतला, ज्यामुळे भारताचे नाव जागतिक स्तरावर उंचावले. त्यांनी अणुऊर्जा सुरक्षा, नियमन आणि संशोधन धोरणांमध्ये घेतलेले निर्णय अनेक देशांसाठी मार्गदर्शक ठरले.

अणुऊर्जेची क्षमता अफाट आहे; पण तिच्याविषयी आजही नागरिकांमध्ये गैरसमज आहेत. ते दूर करण्यासाठी डॉ. भोजे यांनी मोलाचे कार्य केले. ते नेहमी सांगत असत की, अणुऊर्जा हजारो वर्षे पुरेल इतकी आहे. अणुऊर्जेने कोणताही गॅस निर्माण होत नसून ग्लोबल वॉर्मिंगला आळा बसू शकतो. अणुऊर्जा समजावून सांगितली, तरच तिला मान्यता मिळेल. सौरऊर्जा, पवनऊर्जेचा वापर भविष्यात वाढेल; परंतु ती केव्हाही मिळत नाही. त्यासाठी ती साठवून ठेवावी लागेल. जगभरातील ७७० कोटी लोकांना चांगले जीवन जगता यावे, यासाठी खूप मोठी ऊर्जा आवश्यक आहे. यासाठी अणुऊर्जा हा एक सक्षम पर्याय ठरू शकतो, असे त्यांचे मत होते. अणुऊर्जे संबंधीचे प्रबोधन आणि आकलन लोकांना होण्यासाठी त्यांनी ३०० पेक्षा जास्त वैज्ञानिक लेख लिहून फास्ट ब्रीडर रिॲक्टर तंत्रज्ञान, अणुऊर्जा सुरक्षा, रिॲक्टर कार्यप्रणाली आणि इंधन व्यवस्थापन यासंबंधी सखोल माहिती दिली. डॉ. भोजे हे अत्यंत समर्पित, दूरदर्शी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले व्यक्तिमत्त्व होते. २००३ मध्ये त्यांच्या उत्तुंग वैज्ञानिक कार्याची दखल घेत पद्मश्री पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. याखेरीज होमी भाभा विज्ञान व तंत्रज्ञान पुरस्कार, तसेच आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी वैज्ञानिक उपलब्धी पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांच्या कालातीत योगदानाचा गौरव केला. एक मराठी माणूस गुणवैशिष्ट्यांनी कोणत्याही तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात किती सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतो, याचे ते उत्तम उदाहरण होते. कोल्हापूरच्या मातीतील रांगडेपणा, मनमिळाऊ स्वभाव, चिकित्सक वृत्ती आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा आग्रह यामुळे ते ज्या-ज्या क्षेत्रात जातील त्या-त्या क्षेत्रात त्यांनी अमीट ठसा उमटवला. महर्षी कणाद यांच्यापासून डॉ. अब्दुल कलाम यांच्यापर्यंत भारतीय पदार्थ विज्ञानात अभूतपूर्व क्रांती घडून आली. या क्रांतीची मशागत करण्यात स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील एका पिढीने निष्ठेने समर्पण केले. अशा समर्पित अणुशास्त्रज्ञांमध्ये कोल्हापूरचा सिंहाचा वाटा आहे. डॉ. भोजे हे या परंपरेचे पाईक होते. आजही शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागातील प्राध्यापकांनीही अणुसंशोधनात मोलाची भर टाकली आहे.

# लोकअदालत ही रामबाण उपाय आहे

आपल्या देशातील विविध न्यायालयात कोट्यावधी प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून ती प्रलंबित आहेत. आपल्या देशात न्यायालयांची त्याच बरोबर न्यायाधीशाची संख्या गरजेपेक्षा कमी आहे. त्यामुळे सुद्धा प्रकरणांचा सत्वर निपटारा होण्यास विलंब लागत आहे. वर्षांनुवर्षे निकाल लागत नाहीत. लोक कंटाळून जातात. प्रत्येक वेळी पुढची तारीख , पुढची तारीख त्यामुळे त्यामुळे कधी कधी ग्रामीण भागात कोणी म्हटलेले आहे शहाण्याने कधी कोर्टाची पायरी चढू नये. यावर उपाय म्हणून कोर्टातील प्रकरणाचा काही अंशी निपटारा होण्यासाठी लोक अदालत साठी १९८७ आली कायदेशीर दर्जा देणेत आलेला आहे.

त्याची बातमी आज दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी वाचनात आली ती अशी की, तडजोडीतून मिटले कोट्यावधी वाद. लोकअदालत ठरतेय न्यायदानासाठी प्रभावी. २०२४ मध्ये देशात दहा कोटी ४५ लाख प्रकरणे निकाली. लोकअदालतींना विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ अंतर्गत कायदेशीर दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण प्रत्येक वर्षी राष्ट्रीय लोकअदालतीच्या तारखा जाहीर करते. लोकअदालत न्यायालयाबाहेर वाद मिटवण्याचा एक महत्त्वाचा मंच आहे. येथे सामंजस्याने प्रकरणे निकाली काढली जातात. यात तडजोड किंवा समझोता होऊ शकतील ,अशा प्रकारची प्रकरणे प्रामुख्याने घेतली जातात.

यामध्ये मालमत्तेचे वाद , कौटुंबिक वाद ,बँकेतील कर्ज प्रकरणे ,तसेच किरकोळ स्वरूपाचे गुन्हे इत्यादीचा समावेश असतो. मुंबई : न्याय हा देशातील प्रत्येक नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. मात्र ,न्यायालयीन प्रक्रियेची गुंतागुंत , सुनावणीसाठी लागणारा वेळ, खर्च यामुळे अनेकांचे कित्येक वर्ष लोटतात. त्यामुळे प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी देशात राष्ट्रीय , राज्य लोक अदालत ही महत्त्वाची संकल्पना अस्तित्वात आली. तसेच स्थायी लोकआदालतीच्या माध्यमातून लोकांना जलद, सुलभ कमी वेळेत न्याय मिळवून देण्यात येत आहे. देशात राष्ट्रीय लोकअदालतीत वर्ष २०२४ मध्ये १८ कोटी ४९ लाख ६९ हजार ३९३ प्रकरणे दाखल करण्यात आली.

त्यापैकी १० कोटी ४५ लाख २६ हजार ११९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. देशभरात उत्तर प्रदेशानंतर महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकअदालतीत सर्वाधिक प्रकरणांचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकअदालतीत २०२४ या वर्षात ५ कोटी ८० लाख ८६ हजार २१० प्रकरणे दाखल करण्यात आली. त्यापैकी ४६ लाख ७५ हजार २६४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. ✻ राष्ट्रीय लोक आदालतीत कोट्यावधी प्रकरणे... देशभरात राष्ट्रीय लोक अदालतीत २०२२ या वर्षात ९ कोटी ७६ लाख १९ हजार ९३१ प्रकरणे दाखल करण्यात आली होती. त्यापैकी ४ कोटी १९ लाख २६ हजार १० प्रकरणे निकाली काढण्यात आली .

तर २०२३ या वर्षात तब्बल १४ कोटी २८ लाख १५ हजार १० प्रकरणे दाखल करण्यात आली होती. त्यापैकी ८ कोटी ५३ लाख ४२ हजार २१७ प्रकरणेक निकाली निघाली. ✻ महाराष्ट्रात मोठ्या संख्येने प्रकरणे... राष्ट्रीय लोक अदालतीत महाराष्ट्रात २०२२ मध्ये ३ कोटी ४२ लाख २३ हजार ४८६ प्रकरणे दाखल करण्यात आली. त्यापैकी ४७ लाख ५४ हजार २३९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. २०२३ या वर्षात २ कोटी ७४ लाख ४४ हजार १४ प्रकरणे दाखल करण्यात आली. त्यापैकी ३५ लाख ४३ हजार ७३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

✻ राज्य लोकअदालतीमध्ये अनेक प्रकरणे... राष्ट्रीय लोक अदालतीसोबत देशातील विविध राज्यांमध्ये राज्य लोक अदालती आयोजित केल्या जातात. यामध्ये सुद्धा लाखो प्रकरणाचा निपटारा करण्यात आला आहे. २०२२- २३ या वर्षात देशातील विविध राज्यातील राज्य लोक अदालती आणि गठीत ६२ हजार १९४ पिठासमोर ३० लाख ३ हजार २६९ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी ८ लाख ५१ हजार ३०९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. २०२३-२४ या वर्षात राज्य लोकअदालती आणि गठीत ९ हजार ८३५ पिठासमोर २२ लाख ५३ हजार ११५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १२ लाख ७ हजार १०३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर २०२४- २५ या वर्षात नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्य लोकअदालत आणि गठीत ७ हजार ९८८ पिठा समोर १६ लाख ४८ हजार ५१६ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी १ लाख ८८ हजार २१ प्रकरणे निकाली निघाली. ✻ महाराष्ट्रात राज्य लोकअदालतींनी सोडवली हजारो प्रकरणे... महाराष्ट्रात २०२२- २३ या वर्षात लोक अदालत आणि गठीत ३० पिठासमोर २ हजार ९५४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३४१ चा निपटारा झाला. २०२३- २४ या वर्षात गठीत ३८ पिठा समोर ६ हजार ४३२ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी ५८० प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

२०२४- २५ या वर्षातील नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्य लोकअदालत व ४ पिठासमोर २१ प्रकरणे ठेवण्यात आली. त्यापैकी एक प्रकरण सोडविण्यात आले. ✻ राज्यात स्थायी लोकअदालतीचा फायदा...राज्यात प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी स्थायी लोकअदालती आहेत. राज्यात २०२२- २३ मध्ये स्थायी लोकआदालतीच्या १ १७ बैठका झाल्या. त्यात प्राप्त १ हजार ३७० प्रकरणापैकी १ हजार २०८ प्रकरणे निकाली निघाली. २०२३-२४ मध्ये १ हजार २३ बैठकामध्ये ७७९ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी ४८५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर २०२४- २५ या वर्षातील नोव्हेंबर २०२४ पर्यंत ६५६ बैठकामध्ये ४६७ प्रकरणे प्राप्त झाली.

✻ लोक अदालत काय आहे ? लोक अदालत ही एक न्यायिक प्रक्रिया आहे. जी न्यायालयात प्रलंबित किंवा न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांचा निपटारा दोन्ही पक्षांमध्ये समेट ,परस्पर सहमती आणि सामंजस्याच्या माध्यमातून करते. लोक अदालतीमध्ये दिलेला निर्णय हा कायदेशीर दृष्ट्या वैध व अंतिम असतो आणि त्याविरोधात पुन्हा न्यायालयात अपील करता येत नाही. ✻ लोकअदालतीला कायदेशीर आधार..... लोकअदालत ही संकल्पना विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७ अंतर्गत अस्तित्वात आली आहे. या कायद्यांतर्गत राष्ट्रीय , राज्य ,जिल्हा व तालुका स्तरावर लोकअदालती भरवण्यात येतात.

त्यांचे आयोजन न्यायालय विधी सेवा प्राधिकरण किंवा स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून केले जाते. ✻ प्रकरण सोडविण्याची प्रक्रिया.....(१) प्रकरणाची निवड... न्यायालयात प्रलंबित असलेली किंवा दाखल होण्याआधीची प्रकरणे, जी परस्पर समेटाने सोडवता येतील, ती लोकअदालतसाठी निवडली जातात. (२) दोन्ही पक्षांची उपस्थिती.... प्रकरणातील दोन्ही बाजूंनी लोकअदालत मध्ये उपस्थित राहणे आवश्यक असते. (३) मध्यस्थी व समजूतदारपणा..... निवृत्त न्यायाधीश ,वकील, सामाजिक कार्यकर्ते ,अधिकारी यांच्या मदतीने दोन्ही बाजूमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो.

(४) परस्पर संमतीने निर्णय.... एकदा निर्णय झाला की, तो न्यायालयीन निर्णया प्रमाणे वैध मानला जातो. त्याची अंमलबजावणी बंधनकारक असते. (५) न्यायालयीन फी माफ.... लोकअदालत मध्ये प्रकरण निकाली निघाल्यास कोर्ट फी परत केली जाते. वरील बातमी वाचल्या नंतर ज्यांच्या विविध न्यायालयात प्रलंबित असणारी प्रकरणे एकमेकांच्या समजुतीने मिटवून घेण्याचा प्रयत्न केला तर न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे कमी होतील. परवा कराड येथील चार वर्षापासून बाप आणि मुलगा एकमेकांशी बोलत नव्हते न्यायालयात प्रकरण चालू होते ते लोकअदालतमध्ये समेट घडवून आणलेला आहे. दोघांनी प्रथमच एकमेकास अलिंगन दिले. दोघांच्या डोळ्यात आनंद अश्रू आलेले होते. हे केवळ या लोक अदालतमुळे शक्य झालेले आहे. त्यामुळे प्रलंबित प्रकरणे निर्गत होणे साठी लोकअदालत ही रामबाण उपाय आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.


**********

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# संधी आणि आव्हाने

भारताचे पंधरावे उपराष्ट्रपती म्हणून सी पी राधाकृष्णन यांनी शुक्रवारी शपथ घेतली. केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने त्यांना उमेदवारी जाहीर केली तेव्हाच त्यांचा विजय निश्चित होता. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देऊन दक्षिण विरूद्ध दक्षिण अशी चुरस निर्माण करण्याचा प्रयत्न केला. रालोआतील घटक पक्ष विशेषत: चंद्राबाबू नायडूंच्या टीडीपीला धर्मसंकटात टाकण्याची यामागे चाल होती. त्याचे कारण रेड्डी आंध्र प्रदेशचे आहेत. नायडूंना प्रादेशिक अस्मिता जपत त्यांना पाठिंबा देणे बाध्य ठरेल हा यामागचा काँग्रेसचा विचार असावा. तथापि, रालोआ एकसंध राहिली. उलट विरोधी आघाडीतील मते फुटल्याचे दावे केले गेले.

गमतीचा भाग असा की आपली मते फुटल्याचे मान्य करण्यास इंडिया आघाडीतील एकही पक्ष तयार नाही. राधाकृष्णन मोठ्या फरकाने विजयी झाले. भारतीय जनता पार्टीला आजवर आपले पाय रोवता आले नाहीत त्या तामिळनाडूतील ते नेते आहेत. मुळात उत्तर भारतातील पक्ष हा भाजपवर असलेला शिक्का काही प्रमाणात कर्नाटकातील त्या पक्षाच्या विजयाने काही अंशी पुसला असला तरी तामिळनाडू, केरळ आदी राज्ये भाजपसाठी आव्हानच ठरली आहेत. या सगळ्यातून भाजपने राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती करत दक्षिणेकडील राज्यांना संदेश देण्याचाही प्रयत्न केला आहे. उपराष्ट्रपती संसदेचे वरिष्ठ सभागृह राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. या सभागृहाचा कारभार त्यांना चालवायचा असतो. तेथेच या पदावरील व्यक्तीची खरी कसोटी असते आणि त्याला राधाकृष्णन यांनाही सामोरे जावे लागणार आहे. किशोरावस्थेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेलेल्या राधाकृष्णन यांनी जनसंघाच्या माध्यमातून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. नंतर ते तामिळनाडूत भारतीय जनता पार्टीचा चेहरा बनले. हा त्यांचा राजकीय भूतकाळ झाला. वर्तमानात त्यांना काही निर्णय घेताना अथवा नव्या भूमिकेत वावरताना यात बदल करणे क्रमप्राप्त होईल. त्याचे कारण राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभेचे सभापती ही पदे तुमची विचारधारा आणि तुमचा पूर्वीचा राजकीय पक्ष कोणता होता याच्या पलिकडे असतात. त्यांना आपला आणि विरोधी असा भेदभाव करता येत नाही आणि त्यांच्याकडून तशी अपेक्षाही नसते. याच कारणास्तव राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या व्यक्तींची निवड व्हावी असा अलिखित संकेत आहे. राधाकृष्णन यांच्यासमोर मोठे आव्हान असेल ते येथेच. भाजपचे नेते या आपल्या प्रतिमेतून बाहेर पडत त्यांना राज्यसभेचा कारभार सर्वांना विश्वासात घेत आणि सगळ्यांच्या मनात विश्वास निर्माण करतच करावा लागेल. या अगोदर जगदीप धनखड या पदावर होते. धनखड मुळात भाजपचे नव्हते. मात्र त्यांचे भाजपशी चांगले सूत जुळले. त्यामुळे प. बंगालसारख्या महत्त्वाच्या राज्यात अगोदर राज्यपाल म्हणून काम करण्याची त्यांना संधी दिली गेली. नंतर धक्कातंत्राचा भाग म्हणून अचानक त्यांना उपराष्ट्रपती पदाची उमेदवारी दिली गेली. धनखड यांचा बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या सरकारशी असलेला संघर्ष त्यांना या बढतीसाठी कामी आला. राज्यसभेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांच्याकडे संशयानेच पाहिले गेले आणि त्याबद्दल अनेकदा ओरडही झाली. सभागृहातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे, तृणमूलचे ज्येष्ठ नेते, आम आदमी पक्षाचे नेते यांच्याशी धनखडांचा संघर्ष व त्यांच्यावरचा अविश्वास प्रत्येक अधिवेशनात दिसला. विरोधकांना संधी दिली जात नाही येथपासून विरोधकांचे माइक बंद केले जातात असे आरोप संसदेच्या दोन्ही सभागृहांतील नेत्यांनी अध्यक्षांवर आणि सभापतींवर केले आहेत. राज्यसभेत तुलनेने अधिक जाणकार व्यक्ती असतात असे मानले जाते. विविध विषयांतील त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा लाभ व्हावा यासाठी राजकीय पक्षांकडूनच दिग्गजांना राज्यसभेसाठी संधी दिली जाते. अर्थात आता तसेही काही राहिले नाही; मात्र अजूनही तेथे बर्यापैकी शांततेत कामकाज चालते. धनखडांकडे जेव्हा ही जबाबदारी होती त्यावेळी जे आरोप त्यांच्यावर झाले ते त्यांच्यावर नाही तर राज्यसभेच्या अध्यक्षांवरच होते. नव्या अध्यक्षांना म्हणजे राधाकृष्णन यांना सर्वप्रथम ही कोंडी फोडावी लागणार आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यातील संघर्षात उपराष्ट्रपतींना तटस्थच राहावे लागते. त्यात जर त्यांच्याकडून गल्लत झाली तर पक्षपाताचा आरोप होतो. राधाकृष्णन यांना यासाठी प्रत्येक पावलावर सावध राहावे लागेल. आपल्या जुन्या लागेबांध्यांना जागत जर राज्यसभेचे अध्यक्ष सत्ताधारी पक्षाला झुकते माप देत आहेत असे विरोधकांना वाटू लागले तर सभागृहाचे कामकाज होऊच शकणार नाही. अलीकडच्या काळात दोन्ही सभागृहांत असे गदारोळाचे आणि तीव्र संघर्षाचे प्रकार वारंवार पाहायला मिळाले. त्यामुळे सभागृहातील भविष्यातील सत्ताधारी-विरोधकांच्या संघर्षाचे क्षण हा राधाकृष्णन यांच्या कसोटीचा काळ ठरणार आहे.



मुळात त्यांच्या अगोदरचे उपराष्ट्रपती धनखड यांचे सत्ताधार्यांसोबतच मतभेद झाले होते. ते तीव्र स्वरूपाचे होते व त्यामुळेच त्यांनी तडकाफडकी राजीनामा दिला. भविष्यात पुन्हा अशी अवघडल्यासारखी स्थिती होऊ नये याची खबरदारी सरकारने राधाकृष्णन यांच्या निवडीद्वारे घेतल्याचे म्हटले जाते. त्यामुळेच आपल्याच मुशीत तयार झालेल्या व्यक्तीला त्यांनी आणले असे जाहीरपणे सांगितलेही गेले. नेमकी हीच बाब राधाकृष्णन यांच्यावर त्यांची राजकीय निष्पक्षता सिद्ध करण्यासाठी दबाव निर्माण करणारी असणार आहे. सभागृहाची प्रतिष्ठा जपताना त्यांना संतुलन साधावे लागेल. उपराष्ट्रपतींना राजकीय अनुभव आहे ही त्यांच्यासाठी जमेची बाजू ठरावी. तथापि, निष्पक्षपणा, धैर्य आणि संवैधानिक मूल्यांनुसार काम करून सभागृहातील दोन्ही बाजूंमध्ये संतुलन निर्माण केले जाऊ शकते आणि त्याद्वारे सभागृहाची मर्यादा आणि प्रतिमाही उजळ ठरवता येऊ शकते ही संधी राधाकृष्णन यांच्यासमोर आहे.

# १% बाबासाहेब: लाखो जीवनांचे परिवर्तन

एक विधी अभ्यासक, दिवंगत सोमनाथ सुर्यवंशी यांची आई म्हणते, माझा मुलगा फक्त बाबासाहेबांचा १% होण्याचे स्वप्न पाहत होता. संविधानाचा अवमान होत असल्याच्या निषेधामध्ये सहभागी असताना सोमनाथने आपले प्राण गमावले. डॉ. आंबेडकरांनी आपल्याला शपथ दिली होती की, जे काही तुमच्या किंवा समाजाच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवेल, त्या समोर कधीही नतमस्तक होऊ नका. लाखो लोकांसाठी डॉ. आंबेडकर हे नवसूर्य होते, ज्यांनी त्यांना सडलेल्या सामाजिक व्यवस्थेच्या दलदलीतून बाहेर काढले. बाबासाहेबांचे १% असणे म्हणजेच लाखो लोकांना निराशेच्या खाईतून वर उचलणे, त्यांचे जीवन मार्गदर्शित करणे, आणि न्यायासाठी ठाम उभे राहणे. हे समर्थन, ताकद आणि सत्याचे प्रतीक आहे. एकदा तुम्ही बाबासाहेबांचे विचार समजून घेतले की, तुमची भीती संपते आणि लोकशाहीतील अन्यायांना आव्हान देण्याचे धैर्य निर्माण होते. तुम्हाला वाटते की तुम्ही सत्याच्या बाजूने आहात. 'आंबेडकर' या शब्दाची ताकद तुम्हाला कधीच सोडत नाही – ती तुम्हाला प्रत्येक टप्प्यावर प्रेरित करते आणि बळ देते. 'आंबेडकर' हे नाव नवीन विचार, नवीन उर्जा आणि नवीन आकांक्षा प्रज्वलित करते. ते सामाजिक परिवर्तनाचे प्रश्न सोडवते आणि स्वाभिमानाने लोकशाहीच्या विरोधकांसमोर उभे राहण्यासाठी प्रेरणा देते. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणून, आपण त्यांच्या विचारांना पुढे नेण्यासाठी विवेकशील कर्मांद्वारे कार्य करणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांची विचारधारा थांबवता येणारी नाही – ती आता वैश्विक सार्वत्रिक तत्त्वज्ञान बनली आहे. आंबेडकरी युवकांनी बुद्धिमान बनण्यासाठी आणि संविधानिक अधिकारांच्या जागा मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. या भूमिकांमुळे आपल्या समाजाच्या दयनीय परिस्थितीवर मात करता येईल. जरी अनपेक्षित आव्हाने येतील, तरीही आपल्याला ठाम राहावे लागेल. राजकारण हे शोषितांचे बंदिस्त भविष्य उघडण्याची गुरुकिल्ली आहे. छत्रपती शाहू महाराज म्हणाले होते, जोपर्यंत शोषित वर्गांना राजकीय सत्तेत समान प्रतिनिधित्व मिळत नाही, तोपर्यंत खरी लोकशाही साध्य होऊ शकत नाही. राजकीय हक्क हे शोषितांच्या उन्नतीसाठी मूलभूत आहेत. आपला संघर्ष राजकीय हक्क मिळवण्यासाठी असायला हवा, ज्यामध्ये समाविष्ट आहेत: मतदानाचा हक्क, निवडणूक लढवण्याचा हक्क, राजकीय क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्याचा हक्क, अर्ज करण्याचा हक्क, आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य. राजकीय प्रतिनिधित्वाचे महत्त्व: १. निवडणूक प्रतिनिधित्व – आपल्या मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे नेते निवडणे. २. प्रमाणानुसार प्रतिनिधित्व – अल्पसंख्याकांच्या मतांचा आदर होणे. ३. आरक्षित प्रतिनिधित्व – वंचित समुदायांसाठी समावेश सुनिश्चित करणे. हे हक्क लोकशाही समाजवादाच्या मूलभूत मूल्यांसह अंमलात आणले गेले पाहिजेत. आज भारतीय राजकारणाची धुरा डॉ. आंबेडकरांच्या विचारांभोवती फिरत आहे. राजकीय पक्ष बाबासाहेबांचा वारसा आपल्या नावावर करण्याच्या स्पर्धेत आहेत, अनेकदा त्यांच्या विचारधारेचा अपहरण करून युवकांची दिशाभूल करतात आणि गुप्त अजेंडे पुढे नेतात. आपला भर सशक्तीकरण, प्रतिनिधित्व, आणि व्यवस्थात्मक भेदभावाविरुद्ध लढण्यावर असायला हवा. जाती आधारित हिंसा, सामाजिक बहिष्कार, आणि राजकीय देखाव्याच्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल. मात्र, आंबेडकरी विचारसरणी भारताचे राजकीय परिदृश्य बदलण्यासाठी प्रयत्नशील आहे. ती राजकीय सहभाग, शिक्षण, आणि आर्थिक प्रगतीद्वारे समानतेवर भर देते.

दादाराव कैलास तायडे.
(इ.ऊे., ङ्ङ.इ., च.–. (झेश्र. ङ्ळ.), ङएढ)

## रात्रीच्या जेवणासाठी झटपट बनवा चविष्ट गोवन फिश करी, नोट करून घ्या पारंपारिक रेसिपी



जगभरातील लाखो पर्यटक दरवर्षी गोवा फिरण्यासाठी येतात. गोव्यातील सुंदर समुद्रकिनारे, संस्कृती आणि चविष्ट गोवन पद्धतीमध्ये बनवलेल्या जेवणाचा आस्वाद घेतात. गोव्यातील सी फ्रुड जगभरात सगळीकडे फेमस आहे. तिथे वेगवेगळ्या माशांचा वापर करून फिश करी आणि फिश फ्राय बनवले जातात. गोव्यातील खाद्य संस्कृतीचा आस्वाद घेण्यासाठी खास करून पर्यटक गोव्यात जातात. त्यातील सगळ्यांचा आवडता पदार्थ म्हणजे गोवन फिश करी. ओल्या खोबऱ्याचा किस, कोकम आणि त्रिफळाचा वापर करून बनवलेली करी चवीला अतिशय सुंदर लागते. गोवन फिश करी आणि वाफाळता उकड्या तांदळाचा भात हे कॉम्बिनेशन चवीला अतिशय सुंदर लागते. गोव्यातील पारंपरिक पदार्थांची चव तुम्ही घरी बसून सुद्धा घेऊ शकता. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला गोवन फिश करी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. साहित्य: सुरमई/पापलेट/रावस– कोणतेही मासे ओल्या खोबऱ्याचा किस कोकम मीठ त्रिफळा कांदा टोमॅटो धणे लाल तिखट हळद काळीमिरी

तेल कृती: गोवन फिश करी बनवण्यासाठी सर्वप्रथम, सुरमई किंवा तुमच्या आवडीचे कोणतेही मासे घेऊन स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर माशांना कोकम रस आणि चवीनुसार मीठ टाकून काहीवेळ बाजूला ठेवा. मिक्सरच्या भांड्यात ओले खोबरे, लसूण, आले, जिरे, काळीमिरी, लाल तिखट, धणे पावडर, त्रिफळा, कांदा, टोमॅटो घेऊन त्यात थोडे पाणी घालून बारीक पेस्ट तयार करून घ्या. पेस्ट त्यात करताना त्यात तुम्ही आवश्यकतेनुसार पाणी घालू शकता. कढईमध्ये तेल गरम करून त्यात बारीक चिरलेला कांदा आणि लसूण सोनेरी होईपर्यंत भाजा. त्यानंतर त्यात लाल तिखट, हळद घालून त्यात केलेले वाटण टाकून तेलात भाजून घ्या. त्यानंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून करीला उकळी काढा. त्यानंतर त्यात कोकम लावून ठेवलेले मासे टाकून शिजवा. माश्यांची चव वाढवण्यासाठी त्यात कोकम टाका. मासे शिजल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली गोवन फिश करी.

## गणपतीच्या नैवेद्याची शान वाढवेल कुरकुरीत कोथिंबीर वडी; नोट करा पारंपरिक रेसिपी

गणेश चतुर्थीच्या दिवशी बाप्पाला अनेक पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. नैवेद्याच्या या ताटात मोदक, मसाले भात, भजी अशा विविध पदार्थांचा समावेश होतो. नैवेद्याच्या ताटाची ही मजा तुम्ही आणखीन एका पदार्थाने द्विगुणित करू शकता आणि हा पदार्थ म्हणजे कोथिंबीर वडी. कुरकुरीत चवीची ही खमंग वडी महाराष्ट्राच्या पारंपरिक पदार्थांपैकी एक आहे. ताज्या हिरव्या कोथिंबिरीपासून बनणारी ही वडी चविष्ट, खमंग आणि पौष्टिक असते. सकाळच्या नाश्त्यासाठी, संध्याकाळच्या वेळेस चहा बरोबर किंवा पाहुणचाराला पटकन बनवता येणारा हा उत्तम पर्याय आहे. कोथिंबीर वडी वाफवून किंवा तळून दोन्ही प्रकारे खाऊ शकतो. वाफवलेली वडी थोडी हेल्दी तर तळलेली वडी खुसखुशीत



लागते. बाप्पाच्या आगमनाच्या या मंगल प्रसंगी तुम्ही घरी कोथिंबीर वडीचा बेत करू शकता. चला तर मग लगेच जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य कोथिंबीर – २ कप (बारीक चिरलेली) बेसन – १ कप तांदळाचे पीठ – २ टेबलस्पून आलं–लसूण–मिरची पेस्ट – १ टीस्पून लाल तिखट – १ टीस्पून हळद – ट टीस्पून धणे–जिरे पूड – १ टीस्पून तीळ – १ टीस्पून मीठ – चवीनुसार पाणी – आवश्यकतेनुसार तेल – तळण्यासाठी कृती यासाठी सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात बारीक चिरलेली कोथिंबीर, बेसन, तांदळाचे पीठ,आलं–लसूण–मिरची पेस्ट, हळद, लाल तिखट, धणे–जिरे पूड, मीठ आणि तीळ असे सर्व साहित्य टाकून चांगले एकत्र करा. थोडं–थोडं पाणी घालून घट्टसर एक पीठ तयार करा. आता गॅसवर स्टीमर किंवा इडलीच्या साच्यात पाणी घालून पाण्याला उकळी येऊ द्या. तयार मिश्रणाचे लांब असे गोळे तयार करा आणि हे गोळे इडली पात्रात ठेवून द्या. कोथिंबीरचे हे गोळे छान १५–२० मिनिटे मध्यम आचेवर वाफवून घ्या. इडली पात्र लगेच उघडू नका तर गॅस बंद केल्याच्या ५ मिनिटांनंतर इडली पात्र उघडा आणि यातील गोळे बाहेर काढा गोळे छान थंड झाले की चाकूच्या मदतीने त्यांचे तुकडे करा तयार तुकडे गरम तेलात सोनेरी होईपर्यंत कुरकुरीत तळून घ्या आणि तयार वडी खाण्यासाठी सर्व्ह करा. तुम्ही कोथिंबीर वडी शॅलो फ्राय देखील करू शकता.

## गणपती बाप्पाच्या नैवेद्यासाठी कोकणातील पारंपरिक पद्धतीमध्ये बनवा वाटपाची डाळ, नोट करा रेसिपी

भारतीय जेवणाच्या ताटामध्ये कायमच भात, डाळ, भाजी, चपाती हे प्रमुख पदार्थ कायमच असतात. या पदार्थांशिवाय जेवणाचे ताटात अपूर्ण दिसते. जेवणातील डाळ बनवतना अनेक वेगवेगळ्या डाळींचा वापर केला जातो. कधी तुरीची डाळ वापरली जाते तर कधी मुगाच्या डाळीचे वरण बनवले जाते. डाळ बदलल्यानंतर डाळीची चव सुद्धा बदलते. कोकणात सणावाराच्या दिवसांमध्ये पारंपरिक पद्धतीने वाटपाची डाळ बनवली जाते. वाटपाची डाळीची चव अतिशय सुंदर लागते. खोबऱ्याचं वाटण टाकून बनवलेली डाळ जर जेवणाच्या ताटात असेल तर चार घास जास्त जातात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला पारंपरिक पद्धतीमध्ये वाटपाची डाळ बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. गरमागरम वाफाळत्या भातासोबत वाटपाची डाळ अतिशय सुंदर लागते. चला



तर जाणून घेऊया कोकणातील पारंपरिक पद्धतीने वाटपाची डाळ बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
- तूरडाळ
- हिरवी मिरची
- जिरं
- ओल्या खोबऱ्याचं वाटण
- हळद
- मीठ
- तेल
- मोहरी
- लसूण
- कढीपत्त्याची पाने
- हिंग
- टोमॅटो

कृती:

वाटपाची डाळ बनवण्यासाठी सर्वप्रथम, कुकरच्या भांड्यात डाळ घेऊन स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर त्यात टोमॅटो आणि हिरव्या मिरचीचे तुकडे टाकून कुकरच्या चार किंवा पाच शिट्ट्या काढा.

कढईमध्ये तेल गरम करण्यासाठी ठेवा. गरम तेलात मोहरी, हिंग आणि जिरं टाकून भाजा. नंतर त्यात बारीक चिरून घेतलेली लसूण आणि कढीपत्त्याची पाने घालून फोडणी भाजून घ्या.

तयार केलेल्या फोडणीमध्ये हळद टाकून वरून खोबऱ्याचे वाटण टाकून व्यवस्थित भाजा. वाटपाला तेल सुटल्यानंतर त्यात शिजवून घेतलेली डाळ आणि आवश्यकतेनुसार पाणी घालून व्यवस्थित मिक्स करा.

सगळ्यात शेवटी चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित डाळीला उकळी काढून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली वाटपाची डाळ. कोकणातील नैवेद्यासाठी यापद्धतीने डाळ बनवली जाते.

# लठ्ठपणामुळे पोटावर साचलेत चरबीचे टायर, बाबा रामदेवांचा रामबाण पदार्थ करेल तुम्हाला Slim Trim

महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक; पुरुषांमध्ये मृत्युदर जास्त; धक्कादायक आकडेवारी आली समोर! (सौजन्य – लोकसत्ता ग्राफिक्स टीम) देशातील कर्करोग रुग्णांमध्ये महिलांचा वाटा अधिक आहे. एकूण रुग्णांपैकी ५१.१% महिला असून, पुरुषांच्या तुलनेत हा आकडा जास्त आहे. मात्र, मृत्युदराच्या बाबतीत चित्र वेगळं आहे. महिलांचा कर्करोग मृत्युदर तुलनेने कमी असून, तो फक्त ४५ टक्के आहे..

पुरुषांमध्ये तोंडाचा कर्करोग सर्वाधिक प्रमाणात आढळतो. आतापर्यंत फुप्फुसाचा कर्करोग आघाडीवर होता, पण ताज्या आकडेवारीनुसार तोंडाचा कर्करोग आता पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. देशातील ईशान्येकडील राज्यांमध्ये कर्करोगचे प्रमाण सर्वाधिक नोंदवले गेले आहे. त्या भागात कर्करोग रुग्णसंख्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे. २०१५ ते २०१९ दरम्यान देशभरातील ४३ कर्करोग नोंदणी केंद्रांमधून गोळा केलेल्या माहितीवर प्रमुख संस्थांमधील संशोधकांनी केलेल्या विश्लेषणातून हे काही महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत, ज्या काळात ७.०८ लाख कर्करोगाचे रुग्ण आणि २.०६ लाख मृत्यू नोंदवले गेले होते. विश्लेषणाच्या आधारे ीशी४.शरीलहशीी ने मांडलेल्या अंदाजानुसार २०२४ मध्ये देशभरात एकूण १५.६ लाख कर्करोगाचे रुग्ण आणि ८.७४ लाख जण मृत्युमुखी गेले. लोकसंख्या–आधारित कर्करोग नोंदणी केंद्रे निवडक भौगोलिक क्षेत्रांमधील नवीन कर्करोग प्रकरणे, मृत्यू आणि ट्रेंड्सबाबत माहिती गोळा करतात. भारतातील नोंदणी केंद्रे सध्या २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अंशतः किंवा पूर्णपणे व्यापू शकतात आणि त्या माध्यमातून देशाच्या सुमारे १०% ते १८% लोकसंख्येतील ट्रेंड्सवर लक्ष ठेवले जाते. नव्या नोंदणी काश्मीर, प्रयागराज व तिरुवनंतपुरमसारख्या भागांत सुरू झाल्या आहेत. हे विश्लेषण देशभरातील संशोधकांच्या गटाने विविध रुग्णालयांतून गोळा केलेल्या माहितीच्या आधारे केले. त्यामध्ये एम्स–दिल्ली, अड्यार कॅन्सर इन्स्टिट्यूट–चेन्नई, पीडी हिंदुजा–मुंबई, टाटा मेमोरियल सेंटर–नवी मुंबई व आसाम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल यांचा समावेश आहे. मात्र, २०२० ची माहिती यात घेतलेली नाही. कारण–कोविड–१९ चा आरोग्य व्यवस्था आणि नोंदणीवर मोठा परिणाम झाला होता. कर्करोग उपचारासाठी सरकारकडून अनेक योजना राबविण्यात येत आहेत आणि काही नव्या योजना अंमलबजावणीच्या टप्प्यात आहेत. त्यात आरोग्य व वेलनेस सेंटर्सच्या माध्यमातून प्राथमिक स्तरावर कर्करोग तपासणी, देशभरातील सर्व जिल्ह्यांत सुरू होणारी डे–केअर सेंटर्स आणि आयुष्मान भारत योजनेखाली तृतीयक केंद्रांमध्ये उपचाराची सुविधा यांचा समावेश आहे. तसेच, कर्करोगावरील नवनवीन औषधे स्वस्त करण्यासाठी सरकारने त्यावरील कर आणि शुल्क कमी करण्यावर काम सुरू केले आहे. नोंदणी माहितीच्या विश्लेषणातून समोर आलेल्या प्रमुख ट्रेंडमध्ये हे समाविष्ट आहे : महिलांमध्ये कर्करोगाचे जास्त रुग्ण आढळतात देशातील कर्करोग नोंदणीचे समन्वय साधणारे आयसीएमआर–नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स अँड रिसर्चचे संचालक डॉ. प्रशांत माथूर सांगतात, लिंगानुसार दिसून येणारी ही तफावत प्रामुख्याने कर्करोगाचे निदान होण्यासाठी लागणार्या वेळेशी संबंधित आहे. महिलांमध्ये रुग्णसंख्या जास्त आणि मृत्युदर कमी असण्यामागचं कारण निदान होण्यासाठी लागणारा वेळ आणि कॅन्सरचे प्रकार हे आहेत. स्तन आणि गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग हे एकत्रितपणे ४०% महिलांमध्ये होणाऱ्या कर्करोगांसाठी जबाबदार असतात. सामान्यतः चांगले रोगनिदान, जगण्याची उच्च क्षमता व आधीपासून उपलब्ध असलेले तपासणी कार्यक्रम असल्यामुळे वेळेत निदान आणि उपचार शक्य होतात. त्यांच्या मते, पुरुषांमध्ये मात्र तोंडाचा, फुप्फुसाचा, यकृताचा, पोटाचा व अन्ननलिकेचा कॅन्सर हे प्रमुख प्रकार असून, त्यांचे बहुतेक वेळा उशिरा निदान होते. त्यामुळे मृत्युदर महिलांच्या तुलनेत जास्त आहे. डॉ. माथूर पुढे म्हणाले, आमच्या ताज्या सर्व्हायवल ॲनालिसीसनुसार, तोंडाच्या कॅन्सरमध्येही महिलांचा मृत्युदर पुरुषांच्या तुलनेत थोडा कमी आढळतो. तोंडाच्या कर्करोगात वाढ देशातील ४३ कॅन्सर नोंदणीपैकी १४ ठिकाणी पुरुषांमध्ये आणि चार ठिकाणी महिलांमध्ये तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढल्याचे आढळले. विशेष म्हणजे पुरुषांमध्ये तोंडाचा कर्करोग हा फुप्फुसाच्या कर्करोगालाही मागे टाकून सर्वाधिक आढळणारा प्रकार ठरला आहे. ही बाब महत्त्वाची मानली जाते. कारण–गेल्या काही वर्षांत तंबाखूचा वापर कमी झाला आहे. ग्लोबल अडल्ट टोबॅको सर्व्हे च्या दोन फेऱ्यांनुसार भारतात तंबाखू वापरणार्या प्रौढांचे प्रमाण २००९–१० ते २०१६–१७ दरम्यान ३४.६% वरून २८.६% इतके कमी झाले. डॉ. माथूर यांनी सांगितले, कर्करोगावरील अभ्यासातून असे स्पष्ट झाले आहे की, तंबाखूसारख्या कर्करोगजनक घटकाच्या पहिल्या संपर्कानंतर साधारणतः २० किंवा त्याहून अधिक वर्षांनी कर्करोग विकसित होतो. हाच दीर्घ विलंबाचा कालावधी याचे कारण असू शकतो की, तंबाखूचा वापर घटला असला तरी तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. त्यासह अतिमद्यपान हादेखील तोंडाच्या कर्करोगाचा सिद्ध झालेला जोखमीचा घटक आहे आणि त्यामुळेही हा बोजा वाढतो. –खखचड– दिल्लीचे ऑन्कोलॉजिस्ट डॉ. अभिषेक शंकर यांनी सांगितले, मद्यपान हे किमान सात प्रकारच्या कर्करोगाचे धोकादायक घटक मानले जाते, ज्यात तोंडाचा आणि यकृताचा कर्करोग समाविष्ट आहे. त्याशिवाय पोटाचा व मोठ्या आतड्याचा कर्करोग यांसारख्या सामान्य प्रकारच्या कर्करोगाचा धोकादेखील तो वाढवतो. मद्यपान आणि तंबाखूसेवन हे दोन्ही स्वतंत्रपणे कर्करोगाचा धोका वाढवतात; मात्र जेव्हा हे दोन्ही एकत्रितपणे केले जातात, तेव्हा तो धोका अनेक पटींनी वाढतो, असे डॉ. शंकर यांनी स्पष्ट केले.

महिलांसाठी अधिक तपासणीची गरज महिलांमध्ये कर्करोगाच्या मृत्यूचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी संशोधकांनी जागरूकता, तपासणी (ीलीशशपळपस) व लसीकरण यांसारख्या उपाययोजनांची गरज अधोरेखित केली आहे. उदाहरणार्थ– स्तनाचा कर्करोग हा महिलांमधील एकूण कर्करोगांपैकी ३०% आहे आणि तो वेळेवर तपासणी करून शोधता आल्यास बरे होण्याची शक्यता अधिक वाढते. डॉ. माथूर यांनी सांगितले की, गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर दर एक लाख लोकसंख्येमागे फक्त दोन नोंदणी केंद्रांमध्येच चारपेक्षा कमी होता. त्यामुळे तपासणी व्यवस्था, क्षत लसीकरण व जागरूकता यांना अधिक बळकटी देण्याची आवश्यकता आहे.

## ओल्या खोबऱ्याचा वापर करून झटपट बनवा मऊ लुसलुशीत खोबऱ्याची वडी, जिभेवर ठेवताच विरघळेल पदार्थ

सणावाराच्या दिवसांमध्ये घरात अनेक वेगवेगळे गोड पदार्थ कायमच बनवले जातात. कधी शेवयांची खीर तर कधी गुलाबजाम, रसमलाई इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. पण पारंपरिक पदार्थ गणपती उत्सवाच्या दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर बनवले जातात. ओल्या नारळाच्या आतील खोबऱ्याचा वापर भाजी, आमटी किंवा इतर मसालेदार पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. पण आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये मऊ लुसलुशीत खोबऱ्याची वडी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. ओल्या खोबऱ्याच्या वड्या आठवडाभर व्यवथित टिकून राहतात. याशिवाय रात्री जेवणानंतर कोणताही गोड पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यास तुम्ही खोबऱ्याची वडी खाऊ शकता. कमीत कमी साहित्यामध्ये कोणताही गोड पदार्थ बनवण्याचा असेल तर तुम्ही खोबऱ्याच्या वड्या बनवू शकता. चला तर जाणून घेऊया मऊ लुसलुशीत खोबऱ्याच्या वड्या बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
- ओल्या खोबऱ्याचा किस
- साखर
- वेलची पावडर
- तूप
- सुकामेवा

कृती:

ओल्या खोबऱ्याची वडी बनवण्यासाठी कायमच ताज्या खोबऱ्याचा वापर करावा. यामुळे पदार्थ लवकर खराब होत नाही.

वडी बनवण्यासाठी पॅनमध्ये तूप गरम करून त्यात किसलेलं ओल खोबर टाकून खमंग परतून घ्या. खोबऱ्यातील पाणी व्यवस्थित सुकल्यानंतर त्यात एक वाटी साखर घालून व्यवस्थित चमच्याने मिक्स करून घ्या.

साखर आणि ओल खोबर व्यवस्थित मिक्स झाल्यानंतर त्यात वेलची पावडर घालून मिक्स करा. त्यानंतर आवडीनुसार सुका मेवा घालून मिक्स करा.मोठ्या ताटाला तूप लावून सगळीकडे व्यवस्थित पसरवून घ्या. त्यानंतर ताटात तयार केलेले मिश्रण टाकून एकसमान सगळीकडे पसरवा.वडी हलकीशी थंड झाल्यानंतर वरून काजू, बदामाचे तुकडे टाकून तुम्हाला हवी त्या आकारात कापून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली मऊ लुसलुशीत ओल्या खोबऱ्याची वडी.

# महाराष्ट्रात थॅलेसेमियाच्या बालकांच्या संख्येतील वाढ चिंताजनक!

मुंबई : महाराष्ट्रात थॅलेसेमिया असलेल्या बालकांची संख्या सातत्याने वाढत असून हा आनुवंशिक रक्तविकार राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी गंभीर आव्हान ठरत आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर) २०२३ च्या अहवालानुसार देशभरात दरवर्षी सुमारे १० ते १२ हजार थॅलेसेमियाग्रस्त बालकांचा जन्म होतो, तर महाराष्ट्रातच दरवर्षी जवळपास ८०० ते ९०० नवजात बालकांना थॅलेसिमिया मेजरचे निदान होते.



हा विकार हिमोग्लोबिन तयार करणाऱ्या जीनमधील बदलामुळे होतो आणि यात मुलांच्या शरीराला पुरेसे हिमोग्लोबिन तयार करता येत नाही. परिणामी अशा रुग्णांना आयुष्यभर नियमित रक्त संक्रमण करावे लागते.व्यापक प्रमाणात या आजाराविषयी जनजागृती केल्यास अशी बाळे जन्माला येणे टाळता येऊ शकते मात्र यासाठी आरोग्य विभागच नव्हे तर विविध वैद्यकीय संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि कोल्हापूर या शहरी केंद्रांमध्ये थॅलेसेमियाचे प्रमाण सर्वाधिक आहे. ग्रामीण भागातही याचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहे. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेच्या ताज्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील एकूण रक्तसंचाराच्या मागणीत सुमारे २० टक्क्यांहून अधिक मागणी थॅलेसेमियाग्रस्त मुलांसाठीच केली जाते. टाटा मेमोरियल हॉस्पिटल, जे.जे. हॉस्पिटल (मुंबई), केईएम, शीव तसेच ससून इस्पितळ (पुणे) येथे थॅलेसेमियाग्रस्त बालकांची नोंदणी गेल्या तीन वर्षांत सातत्याने वाढलेली आहे.

थॅलेसेमिया हा रक्ताचा अनुवांशिक आजार असून प्रामुख्याने चीनचा पूर्व भाग, ग्रीस, इटाली, सायप्रस, भारत आणि पाकिस्तानात याचे अस्तित्व जाणवते. भारतात गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, ओरिसा व महाराष्ट्रात याचे रुग्ण मोठ्या संख्येने दिसून येतात. जगभरातील एकूण थॅलेसेमियाच्या रुग्णांपैकी दहा टक्के रुग्ण हे भारतीय आहेत. आई व वडील हे दोघेही थॅलेसेमिया मायनर असतील त्यांचे जन्माला येणारे मुल हे थॅलेसेमिया मेजर असते. ज्याला बाहेरून नियमितपणे रक्त चढवावे लागते. तसेच शरिरात जमा होणाऱ्या अतिरिक्त लोहासाठी औषधोपचार करावा लागतो.

या आजाराच्या उपचारासाठी महिन्याला किमान दोन वेळा रक्त चढवावे लागते. तसेच शरीरात लोखंडाचे प्रमाण धोकादायक पातळीवर जाऊ नये म्हणून आयर्न चिलेशन थेरपी अनिवार्य ठरते. एका रुग्णाच्या वार्षिक उपचारावर वार्षिक १ लाखाहून अधिक खर्च येतो. महाराष्ट्र शासनाने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि इतर बालरोग उपचार कार्यक्रमांतर्गत काही प्रमाणात मदत उपलब्ध करून दिली असली तरी ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांसाठी उपचार सुरू ठेवणे हे अद्याप कठीण ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते थॅलेसेमिया हा पूर्णपणे प्रतिबंध करता येणारा आजार आहे. विवाहापूर्वी रक्तातील कॅरिअर टेस्ट करून पती–पत्नी दोघेही थॅलेसेमियाचे जीन वाहक आहेत का हे तपासल्यास रुग्ण बालकाचा जन्म टाळता येतो. सध्या राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद व मुंबई येथे प्री–मॅरिटल स्क्रिनिंग केंद्रे कार्यरत आहेत. मात्र, या चाचण्यांचा प्रसार सर्वसामान्यांपर्यंत पुरेसा झालेला नाही. महाराष्ट्र थॅलेसेमिया सोसायटी व इतर स्वयंसेवी संस्थांनी या संदर्भात जनजागृती मोहीम हाती घेतली असून, पालकांच्या संघटनांनी सरकारकडे अधिक प्रभावी धोरण राबवण्याची मागणी केली आहे. राज्यातील वाढत्या थॅलेसेमिया रुग्णसंख्येचा विचार करता या आजाराचे वेळेवर निदान, परवडणारे औषधोपचार आणि विवाहपूर्व तपासण्या अनिवार्य केल्यास पुढील पिढीला या आजारापासून वाचवता येईल. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेने याकडे गांभीर्याने पाहिले नाही तर महाराष्ट्रातील थॅलेसेमियाग्रस्त बालकांचे संकट आणखी गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# लातूरच्या प्रभाग क्र.३ व ७ मधील अनेक मुस्लिम तरुणांनी केला वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश

लातूर :- वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांची मुस्लिम समाजप्रती असलेली बांधिलकी लक्षात घेवून व त्यांच्या स्वाभिमानी नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूरच्या प्रभाग क्र.३ व ७ मधील अनेक मुस्लिम तरुणांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला.

प्रमुख अतिथी,वंचित बहुजन आघाडीचे युवक सदस्य अमोल लांडगे,वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हाध्यक्ष सलीम सय्यद, जिल्हा निरीक्षक सिध्दोधन सावंत आदिंच्या प्रमुख उपस्थितीत,शहराध्यक्ष इंजि.सचिन गायकवाड यांच्या नेतृत्वात रहीम शेख, बबलू शेख, सोहेल पठाण, शाहेद शेख, तोहीद बागवान,इब्राहिमचाचा शेख, मिनहाज शेख, मोहंमद मोहसीन फुलारी, फेरोज शेख,अजहर तांबोळी,बब्बू शेख, राजू शेख व इतर मुस्लिम कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला.या सर्वांचे स्वागत करुन त्यांना योग्य तो मान सन्मान पक्षात दिला जाईल असे अश्वस्त करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष सलीम सय्यद यांनी



पक्षाचे राष्ट्रीय नेते ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी वेळोवेळी मुस्लिम समाजावर अन्याय होत असताना प्रत्यक्ष पुढाकार घेतला. एनआरसी,ट्रीपल तलाक,मस्जिदीवर भोंगे आदी समाजाशी निगडीत प्रश्नांवर संकटकाळी देश आणि राज्यात आपल्या खांदाला खांदा लावून ताकद दिली आहे.ही गोष्ट मुस्लिम समाजातील तरुणांना लक्षात घेवून वंचित बहुजन आघाडीत येण्याचा निर्णय योग्य असाच आहे,त्यांचे पक्षात स्वागत असून,मुस्लिम समाजाने आता वेळ दवडू नये,वंचितमध्ये दाखल व्हावे असे आवाहन केले.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे लातूर जिल्हा महासचिव ॲड. रोहित सोमवंशी, माजी पदाधिकारी खदीरभाई मणियार, जिल्हा उपाध्यक्ष खलील शेख ,लातूर शहर महासचिव आकाश इंगळे, लातूर शहर उपाध्यक्ष मुन्ना पठाण,लातूर शहर सचिव महेबूब सय्यद,सचिव सैफ शेख, लातूर आयटी प्रमुख विशाल जगताप,समीर शेख, इतर अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते

## वसंत मोरेंनी कळीचा मुद्दा छेडला! भाजपने केलेल्या दाव्याला दिला खोचक सल्ला, पोस्टमधून म्हणाले

नुकतीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात एक मोठी बातमी समोर आली. येत्या काही महिन्यात होऊ घातलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायायलाने राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. पुणे महापालिकेची निवडणूक सतत लांबणीवर पडत असल्याने पुण्याचे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते आणि माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी फेसबुक पोस्ट शेअर करत संताप व्यक्त करत भारतीय जनता पार्टीला खोचक सल्ला दिला आहे. पुणे महापालिकेत भाजपने २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे १०० पेक्षा जास्त नगरसेवक निवडून येणार असल्याचा दावा भाजपने केला होता. या दाव्यावर वसंत मोरे यांनी १६५ नगरसेवक असणाऱ्या पुणे महापालिकेत भाजपला निवडणुकीची भीती वाटत, असेल तर तुमच्या म्हणण्याप्रमाणे १०० तुम्ही जाहीर करा आणि किमान उरलेल्या ६५ जागांवर तरी निवडणूक घ्या असा खोचक सल्ला भाजपला दिला आहे. वसंत मोरेंची फेसबुक पोस्ट 'व्हय मी काय म्हणतो आज सकाळी चहा पिताना एक विचार मनात आलाय भाजपा म्हणते पुण्यात आमचे १०० नगरसेवक निवडून येणार मग माझं पुणे भाजपाला एक सांगणं आहे, तुम्हाला जर निवडणुकांची भीती वाटत असेल तर तुम्ही तुमचे १०० नगरसेवक एकदा कोण कोण ते ठरवा आणि त्यांची नावे जाहीर करून टाका आणि कृपा करून उरलेल्या ६५ जागांवर तरी निवडणुका घ्या राव लय कटाळा आलाय आणि ते इच्छुक तर पार पार बेजार झालेत खर्च करून करून' असं वसंत मोरे पोस्टमध्ये म्हणाले आहेत.

# मराठवाडा मुक्ती लढा हा जनतेचा लढा होता. प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांचे प्रतिपादन

लातूर :- मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ राजकीय लढा नव्हता, तर तो लोकशाही, स्वातंत्र्य व अस्मितेसाठी उभारलेला जनतेचा लढा होता. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या रूपात पूर्णत्व प्राप्त झाले,असे स्पष्ट प्रतिपादन प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांनी केले.लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग व जिल्हा वकील मंडळातर्फे आयोजित मराठवाडा मुक्तिदिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. वाय डी.जगताप होते. विचारमंचावर ज्येष्ठ विधीज्ञ तथा महाराष्ट्र व गेवा वकील परिषदेचे सदस्य ड.अण्णाराव पाटील, ड. बळवंतराव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे अध्यक्ष ड.जांबुवंतराव सोनकवडे व लातूर जिल्हा वकील मंडळाच्या उपाध्यक्षा ड. मनीषा दिवे -पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना डॉ. श्रीकांत गायकवाड पुढे म्हणाले की, वंदे मातरम चळवळ,झेंडा सत्याग्रह,जंगल सत्याग्रह आणि सशस्त्र लढा यांना विशेष महत्त्व होते.. राष्ट्रध्वज फडकवणे,प्रभातफेरी काढणे, क्रांतिसभा घेणे यांसारख्या उपक्रमांमुळे युवकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत झाले..जंगल सत्याग्रहाद्वारे आंदोलकांनी ताडी, शिंदी,मोह व सागाची झाडे तोडून निजामाच्या महसुलाचे स्रोतच उद्ध्वस्त केले. याद्वारे निजामाच्या आर्थिक नाड्या आवळल्या गेल्या. या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ,गोविंदभाई श्रॉफ,बाबासाहेब परांजपे,माधवराव बिंदू,देवीसिंगराव चव्हाण यांसारख्या राष्ट्रभक्तांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या लढ्याला बळ दिले.२७ नोव्हेंबर १९४७ रोजी त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते की, भारतात सामील होण्यास नकार देणाऱ्या निजामाला कोणतीही सहानुभूती दाखवू नये.या लढ्यात सर्व जाती-धर्मांतील नागरिकांसोबत महिलांचेही सक्रिय योगदान होते. अखेर,निजाम वठणीवर येणार नाही ,हे लक्षात घेता संरक्षण मंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशाने १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'पोलीस ॲक्शन' सुरू करण्यात आली. अवघ्या १०९ तासांत, म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी पाच वाजता निजाम मीर उस्मान अली व सरसेनापती मेजर जनरल इल इद्रोस यांनी शरणागती पत्करली आणि मराठवाडा स्वतंत्र झाला,असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविकपर मनोगत व्यक्त करत असताना ज्येष्ठ विधीज्ञ ड.शिवकुमार बनसोडे यांनी येणाऱ्या पिढीला खरा इतिहास सांगण्याचे दायित्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगने स्वीकारले आहे व हे प्रबोधनात्मक कार्य आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ,या भूमिकेतून गेली ८ वर्षे सातत्याने सुरू आहे ,असे सांगितले. या कार्यक्रमात मंचावर उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विधीज्ञ बळवंतराव जाधव यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात त्यांच्या वडिलांनी दिलेल्या महत्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकला व त्या काळातील ऐतिहासिक प्रसंग सांगत सभागृहाला माहिती दिली. तसेच महाराष्ट्र व गोवा वकील परिषद, मुंबईचे सदस्य तथा ज्येष्ठ विधीज्ञ ड.अण्णाराव पाटील यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग सातत्याने करीत असलेल्या



प्रबोधनात्मक कार्याबद्दल कौतुक करीत सर्व पदाधिकाऱ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले व शिव,फुले,शाहू व आंबेडकरी विचारांवर चालणाऱ्या प्रत्येकांनी अशा कार्यक्रमात सहभागी झाले पाहिजे, असे सांगितले .तसेच मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांना विनम्र अभिवादन केले.पूर्वनियोजित या कार्यक्रमाचे अध्यक्ष व लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड.वाय.डी. जगताप यांनी अध्यक्षीय भाषणात ऐतिहासिक संदर्भ हे आपल्याला दिशादर्शक असतात आणि मलादेखील वैचारिक साहित्यव संस्कृती आवडते आणि वैचारिक कार्यक्रमात सहभागी व्हावे वाटते ,असे मत व्यक्त केले .तसेच या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या-पाहुणे व मान्यवरांचे लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने बुके देऊन मनःपूर्वक स्वागत केले आणि असे वैचारिक प्रबोधनात्मक कार्यक्रम यापुढेदेखील होतील आणि मोठ्या संख्येने वकील बांधव सहभागी होतील ,अशी अपेक्षा व्यक्त केली. सदरील कार्यक्रम हा डॉ बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ड.जांबुवंतराव सोनकवडे यांच्या कार्यकुशल नेतृत्वाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे सचिव ड. सचिन कांबळे, सहसचिव ड.प्रशांत गायकवाड ,सदस्य ड.राम गजधने, ड.वसंत उगले,ड.श्रीपती चव्हाण, ड.एम. डी ठाकूर ड.विश्वजीत पाटील आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ विधीज्ञ राजेंद्र लातूरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ड.भारत ननवरे यांनी केले. कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर प्रमुख वक्ते प्रा.डॉ. श्रीकांत गायकवाड व डॉ बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगच्या पदाधिकाऱ्यांनी ज्येष्ठ विधीज्ञ ड.बळवंतराव जाधव यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या मातोश्री मंदोदरी जाधव यांचा यथोचित सत्कार केला. त्यांच्या मातोश्रींनी त्या काळातील काही प्रसंगांवर प्रकाश टाकला व त्याला दुजोरा पुढे ज्येष्ठ विधीज्ञ ड.बळवंतराव जाधव यांनी दिला.

## उदगीर येथे रिपाई आठवले च्या वतीने लिंगायत स्मशान भूमी फुलेनगर येथे वृक्षारोपण



उदगीर /प्रतिनिधी :- रिपब्लिकन पक्षाच्या वतीने उदगीर शहरात असलेल्या महात्मा फुले नगर येथील लिंगायत स्मशान भूमी उदगीर मध्ये मुख्याधिकारी सोमनाथ जाधव यांच्या हस्ते वृक्ष रोपण करण्यात आले , रिपब्लिकन पक्षाचे मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या वेळी रिपब्लिकन पक्षाचे उदगीर तालुका अध्यक्ष ड.प्रफुलकुमार उदगीरकर , ड. बालाजी कारभारी, युवा जिल्हाध्यक्ष सुशीलकुमार शिंदे, नगर अभियंता अनिल कुरे,महेश कवठे, शाहिद हाश्मी, प्रकाश कांबळे, नरेश चांदे उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन पक्षाचे उदगीर शहर अध्यक्ष सुधीर घोरपडे,अमोल पतंगे, मकबूल शेख , भीमराव सूर्यवंशी, इम्रान खान, शंकर वाघमारे, राहुल वाघमारे, खंडू कांबळे, संदीप मेघे, धोंडिबा गजीले, रणजित कांबळे,संतोष शिंदे,तसेच महिला शिल्पा कांबळे, उषा सकट, राधाबाई कांबळे, संगीता कांबळे, साधनाबाई वाघमारे, मुक्ता सगर, मंगल बाई मनसे, कमलबाई टेकाळे, कोकाटे बाई, अनुसयाबाई कांबळे, कमल सूर्यवंशी, ललिता कांबळे, मीरा गायकवाड , उषा गायकवाड, शीला गायकवाड, ललिता गायकवाड, पंचशीला सूर्यवंशी आदी सह शेकडो महिला कार्यकर्ते उपस्थित होते या वेळी महात्मा फुले नगर येथील नागरिकांना होत असलेल्या विविध नागरी समस्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन चे विस्तारीकरण, महिलांसाठी सार्वजनिक शौचालय बांधकाम, विजेचे खांब, नाल्या गटारे स्वच्छता , घंटा गाडी ची व्यवस्था आदी समस्या यांचे लवकरात लवकर निराकरण करून सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील असे आश्वासन नगर मुख्याधिकारी यांनी दिले.

## स्व.सतिष ज्ञानोबा देशमुख यांच्या कुटुंबीयांची डॉ.ज्योतीताई मेटे यांनी घेतली सांत्वन पर भेट



केज/प्रतीनीधी केज तालुक्यातील वरपगाव येथील स्व.सतिष ज्ञानोबा देशमुख हे मराठा आरक्षणासाठी चलो मुंबई या आंदोलनात सहभागी झाले होते. परंतु ते मोहिमेवर असताना जुन्नर येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे दुःखद निधन झाले. मुंबईहून परत येताच डॉ. ज्योतीताई मेटे यांनी शिवसंग्रामच्या टिम समवेत स्व.सतिष ज्ञानोबा देशमुख यांच्या कुटुंबियांचे सांत्वन पर भेट घेऊन त्यांच्या कुटुंबासोबत आज अस्तवाईक चर्चा करून त्यांना धीर दे त्यांना आधार देण्याचे काम डॉ.ज्योतीताई मेटे यांनी केले. याप्रसंगी शिवसंग्रामचे सरचिटणीस अनिल भाऊ घुमरे, युवक जिल्हाध्यक्ष सुनीलराव कुटे,शिवसंग्रामचे केज तालुकाध्यक्ष नामदेवराव गायकवाड,बाळासाहेब गलांडे, शिवाजी वाघमारे,अमोल पोपळे,सुनील कुटे,पवन पवार, बाळासाहेब चाळक,संदीप शितोळे चंद्रकांत देवकर हे उपस्थित होते. त्याचबरोबर सतीश देशमुख, व्यंकटेश देशमुख,प्रसाद देशमुख,सुनील देशमुख,दत्ता देशमुख यांच्यासह शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीमध्ये घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात.

लातूर :- पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीमध्ये घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १७ ते १८ सप्टेंबर रोजीचे मध्यरात्री १२.४५ वाजण्याचे सुमारास पाच नंबर चौक ते औसाकडे जाणारे बायपास रोडने लहुजी साळवे चौक, लातुर येथे गाडीला कट मारण्याच्या कारणावरून क्रुझर गाडीमधून आलेल्या चौघांनी ईरटीका गाडी मधील प्रवाशांसोबत भांडण तक्रारी करून त्यांना शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण केली त्यातील एकाने हातातील चाकुने ईरटीका गाडी मधील अनमोल केवटे याचेवर वार करुन खुन केला व सहप्रवासी सोनाली भोसले यास जीवे मारण्याचे उद्देशाने चाकूने भोसकून गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. त्यावरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा क्रमांक ३६७/२५ कलम १०३(१), १०९(१), १२६(२),३५२,३(५) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमूद गुन्ह्याच्या घटनास्थळास तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट देऊन तपासाबाबत सुचना केल्या त्यानुसार तपासाकरिता पथक नेमण्याबाबत आदेशीत केले. सदरचे आरोपी गुन्हा केल्यानंतर फरार झाले आहेत. पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी गुन्ह्यातील फरार आरोपींचा तात्काळ शोध घेण्याचे निर्देशित केले होते. नमूद गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न झाले आहेत. त्या अनुषंगाने श्री. मंगेश चव्हाण अपर पोलीस अधीक्षक लातूर, श्री. समीरसिंह साळवे उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, पोलीस ठाणे रेणापूरचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे दोन तर पोलीस ठाणे शिवाजीनगर व रेनापुर यांचे प्रत्येकी एक पथक असे एकूण चार पथके तयार करून गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यात येत आहे दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून गुन्ह्यातील आरोपी त्यापैकी एक आरोपी शुभम जयपाल पतंगे, वय २४ वर्ष राहणार संजय नगर, बस स्थानक समोर, रेणापूर. यास त्याचे राहते ठिकाणाहून चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्यात वापरलेली क्रुझर गाडी क्रमांक एम. एच.२६ व्ही २३५६ चा शोध घेऊन ती जप्त करण्यात आली आहे.

गुन्ह्यातील उर्वरित ०३ आरोपींचा शोध सुरू असून लवकरात लवकर त्यांना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात येईल. गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिवाजीनगर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक जिरगे हे करीत आहेत.

# साबला येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सय्यद बाशा पीर साहेब दर्गायाठिकाणी केज पंचायत समितीचे गट विकास अधिकारी विठ्ठलराव नागरगोजे यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे तर प्रमुख पाहुणे तेच पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अनिलराव चौरे, विस्तार अधिकारी विजयकुमार मस्के,उपसरपंच कचराबाई सरवदे, ग्रामपंचायत अधिकारी तानाजी शिंपले, माजी सरपंच मधुकरराव काकडे माजी सरपंच, मोहजेब इनामदार, माजी सरपंच महादेवराव कटारे, माजी सरपंच हनुमंतराव नाईकनवरे, रिपाईच आठवले गटाचे जिल्हाउपाध्यक्ष राहुलराव सरवदे,पार्टी संस्थेचे प्रकल्प समन्वयक वली तांबोळी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते व साबला येथील नागरिकांच्या उपस्थितीत वृक्षारोपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गटविकास अधिकारी विठ्ठलराव नागरगोजे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना नागरगोजे म्हणाले की, आपल्या जीवनात वृक्षांचं महत्व काय आहे. तर सावली गार मिळते,स्वच्छ हवा मिळते,वृक्ष लागवड करणे ही सध्या काळाची गरज आहे व झाडांचे संगोपन हे सर्वांचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान या अभियानात नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा. या योजनेच्या माध्यमातून गावातील स्वच्छतेसाठी महत्व द्यावे असे त्यांनी साबला नगरीतील नागरिकांना समजावून सांगितले. त्याचबरोबर ओला कचरा गोळा करून वेगळा ठेवणे व सुका कचरा गोळा करून वेगळा ठेवणे तसेच प्लास्टिकच्या कॅरी बॅग ईतर कुठेही टाकू नये म्हणजे त्यांच्या पासून डास होणार नाहीत,घाण वास येणार नाही. जसे आपण आपल्या स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतो तशी आपण गावातील नागरिकांच्या आरोग्याची सुध्दा काळजी घेतली पाहिजे.गावातील सांडपाण्यासाठी शोष खड्डा तयार करणे ,त्या पाण्याचा जमिनीत निचरा करणे,आपल्या घराच्या जवळपास घाण न होऊ देणे अशाप्रकारची कामे करण्यासाठी गावातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा.गावात आरोग्य केंद्र असावे , गावातील तरुण युवकांना तसेच वयोवृद्ध



नागरिकांना व्यायाम करण्साठी मोकळे मैदान असावे,गावातील शाळा,अंगणवाडी यांच्या इमारती मजबूत असायला पाहिजेत.

या कार्यक्रमासाठी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यामध्ये नजीर काझी यांनी स्वतः च्या खर्चाने काही वृक्षांची रोपे घेवून दिली आहेत. उपस्थित ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोपट काकडे,गणेश कटारे,महादेव काकडे,बालाजी काकडे,दत्तकुमार काकडे , जालिंदर मुळे,संदिपान काकडे , अभिमान नाईकनवरे,हनुमंत काकडे,अक्षय काकडे,गुलाबराव मुळे,विश्वनाथ नाईकनवरे, लखन राऊत,बाबासाहेब नाकईनवरे, गणेश काकडे,सुदर्शन काकडे, रामहरी काकडे,सिध्देश्वर मुळे, रामेश्वर मुळे , अनिलराव भोसले , महेश काकडे , काशिनाथ काकडे , रंगनाथ काकडे , गोरख काकडे , सौरभ काकडे , राजेश नाकईनवरे , खैरात काझी , खमरोद्दिन काझी , लक्ष्मण महाराज काकडे , नेहाल काझी , अनंत नाकईनवरे , बाबासाहेब काकडे , संदिपान सरवदे , गणेश सरवदे , संतराम सरवदे यावेळी गावातील इत्यादी नागरिक उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण तात्या काकडे यांनी तर प्रास्ताविक आदर्श शिक्षक नरहरी काकडे तर आभार प्रदर्शन विजयकुमार शिंदे केले

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE